# महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.

कार्यासन 30.

इतिवृत्तांतः–

विषय– महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक 22 ऑगस्ट, 2012 रोजी संपन्न झालेल्या 12 व्या बैठकीचे इतिवृत्तांत.

दिनांक 22 ऑगस्ट, 2012 रोजी दुपारी 2.00 वाजता महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची 12 वी बैठक कामगार आयुक्त कार्यालयाच्या समिती सभागृह येथे पार पडली. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | श्री मधुकर बी गायकवाड | : | मा.कामगार आयुक्त,महाराष्ट्र राज्य,मुंबई तथा अध्यक्ष |
| 2 | श्री. सी.बी.पाटील | : | सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई |
| 3 | श्री. अनिल दत्तात्रय ढवळे | | मालक प्रतिनिधी |
| 4 | श्री. रमेश सो. सारडा | : | मालक प्रतिनिधी |
| 5 | श्री. केदार काळे | | मालक प्रतिनिधी |
| 6 | श्री प्रकाश देवतळे | : | मालक प्रतिनिधी |
| 7 | श्री वसंत गणपत सावंत | : | कामगार प्रतिनिधी |
| 8 | श्री मुनवर शेख | : | कामगार प्रतिनिधी |
| 9 | श्री राजेश फुले | : | कामगार प्रतिनिधी |
| 10 | श्री दादाराव डोंगरे | | कामगार प्रतिनिधी |
| 11 | श्रीमती राधिका गायकवाड | : | कामगार प्रतिनिधी |
| 12 | श्री र. वि. कुलकर्णी | | कामगार उप आयुक्त तथा सचिव |
| 13 | श्री सु.मा. कदम | | सहायक कामगार आयुक्त, मुंबई |

सर्व प्रथम अध्यक्षांनी उपस्थितांचे स्वागत करून बैठकीस सुरूवात केली.

**विषय कमांक 1— मागील दिनांक 7 जून 2012 रोजीच्या इतिवृत्तांतास मंजूरी देणे.**

मागील दिनांक 7 जून 2012 रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्ताताचे वाचन करण्यात आले. या इतिवृत्तात विषय कमांक 2 अंतर्गत शेवटच्या परिच्छेदात जनश्री विमा योजनेस विरोध त्याऐवजी "ही योजना कामगारांना तात्काळ लाभ देणारी नसल्याने तसेच कामगारांच्या कामाचे स्वरूप पाहता त्यांना अपघात आणि इतर सवलती देण्याच्या दृष्टीकोनातून, विशिष्ट प्लॅन देणे आवश्यक असल्याने जनश्री विमा योजना ऐवजी जनरल इन्शुरन्सची योजना सूचविली गेली." असा बदल इतिवृत्तात करण्याचे श्री. डोंगरे यांनी सूचविले आणि असा बदल करण्याचे सर्वानुमते ठरले. त्यानुसार मागील दिनांक 7 जून 2012 रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तांतास एकमताने मान्यता देण्यात आली.

**विषय कमांक 2— बांधकाम कामगार व त्यांच्या पाल्यांसाठी कौशल्य व कौशल्य वृध्दीची योजना शासनाच्या व्यावसाईक शिक्षण विभागामार्फत राबवण्यिास मंजूरी देणे. (पायलट प्रोजेक्ट)**

सदरील विषयाबाबत सांगोपांग चर्चा झाली. व्यवसाय शिक्षण विभागाने दिलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले. यावर श्री. ढवळे यांनी हा कोर्स कोण कन्डक्ट करणार तसेच जाणीव जागृती, जाहिरात देणे व जिल्हास्तरावर समितीने नेमणे असे मुद्दे उपस्थित केले. श्री फुले यांनी प्रशिक्षण केंद्राची निवड व प्रशिक्षण देणे यात मंडळ सदस्यांच्या सहभागाची आवश्यकता दर्शविली. श्री डोंगरे यांनी व्यवसाय शिक्षण विभागास दयावयाच्या रू 2 कोटी रूपयास मंजूरी असून, ते बीला नुसार दयावेत, असे सूचविले. व प्रशिक्षण केंद्र निवड प्रकियेत मंडळ सदस्यांचा सहभाग असावा, असे सांगितले. चर्चेअंती कामगारांना किमान वेतन दराने विद्यावेतन देण्याचे ठरले. सदरील समितीमध्ये खालील सदस्य असतील असे ठरले. सदर सदस्य हे जिल्हयातील सहायक कामगार आयुक्त व जिल्हा व्यवसाय शिक्षण अधिकारी यांचे समवेत होणा—या निवड प्रकियेत सहभागी होतील व सहायक कामगार आयुक्त निवड प्रकियेचे प्रमुख असतील.

| | |
|---|---|
| मुंबई विभाग | श्री मुनवर शेख व श्री महेश मुद्या |
| कोकण विभाग (ठाणे, रायगड, सिंधूदूर्ग व रत्नागिरी जिल्हयाकरीता) | श्री. काळे व श्री. महेश मुद्या |
| औरंगाबाद व पुणे विभाग | श्री ढवळे, श्री. सारडा व श्री फुले |
| नाशिक विभाग | श्रीमती राधिका गायकवाड व श्री डोंगरे |
| नागपूर विभाग | श्री. डोंगरे, श्री. फुले व श्री देवतळे |

ठराव– महाराष्ट शासनाच्या व्यवसाय शिक्षण विभागाच्या प्रस्तावानुसार नोंदणी बांधकाम कामगार व त्यांच्या पाल्यांसाठी कौशल्य व कौशल्य वृध्दीच्या योजनेस एकमताने मंजूरी देण्यात येवून, तुर्तता पायलट प्रोजेक्ट म्हणून योजना राबविण्यासाठी 2 कोटी रूपये मंजूर करण्यात येत आहेत.

**विषय कमांक 3– नोंदीत बांधकाम कामगारांसाठी घरकुल योजनेची अंमलबजावणी करणेबाबत.**

बांधकाम कामगारांसाठी घरकुल योजनेचा बनविलेला मसूदा वाचून दाखविण्यात आला. यात सामाजिक न्याय विभागाच्या योजनेच्या धर्तीवर कच्चे घर अथवा स्वतःची जागा असल्यास पात्र बांधकाम कामगारास स्थळनिहाय म्हणजे ग्रामीण विभागासाठी रू 1 लाख, नगरपरिषद क्षेत्र रू 1.50 लाख, महानगरपालिका क्षेत्र रू 2 लाख व मुंबई महानगर प्रदेश क्षेत्र रू 2 लाख बांधकाम अनुदान दयावे असे, प्रस्तावित केले. यावर अशासकीय सदस्यांनी वेगळे मत मांडले. मालक प्रतिनिधी श्री सारडा यांनी यात सल्लागार नेमून शासनाच्या जमिनी घेवून, अथवा खाजगी जमीन विकत घेवून, त्यावर सल्लागारामार्फत आराखडा तयार करून पात्र कामगारांसाठी घरकुल बांधण्याचा प्रस्तावा मान्य करण्याचे सूचविले. अध्यक्षांनी चर्चा करताना म्हाडा व नगरपालिका यांना यात समाविष्ट केल्यास योग्य होईल, असे मत मांडले. घरकुल निकष व कार्यपध्दती ठरविण्यासाठी एक अभ्यास गट गठीत करण्याचे चर्चेत ठरले. सदर गट 15 दिवसात बैठक घेईल व त्यात याबाबतीतील तज्ञ व्यक्तींना बोलाविण्याचे सर्वानुमते ठरले. यात खालील सदस्यांचा समावेशाचे सर्वानुमते ठरले. बैठकीत आराखडा ठरल्यानंतर योजना राबविण्याचे ठरले.

कामगार आयुक्त तथा अध्यक्ष तसेच कामगार प्रतिनिधी श्री फुले, डोंगरे व श्री शेख तसेच मालक प्रतिनिधी श्री सारडा, ढवळे व श्री मुद्दा हे अभ्यास गटात राहतील.

जिल्हयाच्या ठिकाणी 400, कोकण विभागात 500 व मुंबईमध्ये 1000 घरे बांधण्यात यावीत, असे सूचविले गेले. मा. अध्यक्षांनी कामगारांचे महाराष्टातील वास्तव्य 15 वर्ष असावे, तो नोंदीत कामगार असावा व नोंदणी चालू असावी व त्याचे वय 18 ते 60 पर्यत असावे, असे निकष सूचविले. सदर योजना दोन महिन्यात चालू जावे असे श्री. फुले यांनी सूचविले. उपरोक्त उल्लेखित गटाची बैठक लवकरच घेतली जावून त्यात निकष व कार्यपध्दती बाबत प्रस्ताव केला जाईल, असे ठरले.

ठराव– नोंदीत बांधकाम कामगारांसाठी घरकुल योजना राबविली जाण्याचे एकमताने ठरले.

**विषय कमांक 4 बांधकाम कामगारांच्या अपघातीपोटी रू 2 लाखाचे अर्थसहाय मंजूर करणे.**

वरील बाबत सांगोपांग चर्चा झाली. सदरील मदत नैसर्गिक मृत्यूपोटीही देण्याचे श्री सावंत यांनी सूचविले. यावर श्री ढवळे यांनी केवळ अपघाती मृत्यू झाल्यास ही मदत देण्यात यावी, असे सूचविले. जे सर्वानुमते मान्य करण्यात आले.

ठराव– नोंदीत बांधकाम कामगारांच्या अपघाती मृत्यूपोटी पती अथवा पत्नी अथवा कायदेशीर वारसास रू 2 लाखाचे अर्थ सहाय देण्याचे एकमताने ठरावाद्वारे मंजूर करण्यात आले.

**विषय कमांक 5– बांधकाम कामगारांचे नोंदणी अभियान राबविण्यासाठी विभागीय कार्यालयांना प्रत्येकी रू 5 लाख देणे व त्यासाठी विभागीय कार्यालयांना राष्टीयकृत बॅकेत खाते उघडयाचे परवानगी देणे.**

सदरील बाबत चर्चा होवून विभागीय कार्यालयांना प्रत्येकी रू 3 लाखा ऐवजी रू 5 लाख देण्याचे ठरले. ही रक्कम खालील प्रमाणे खर्च केले जावी

अ. कामगार मेळावे व जाणीव जागृती मोहिम.

ब. लहान प्रमाणातील जाहिराती, उदा. पत्रके, लिफलेट इत्यादी.

क. दूरवरच्या कामावरील क्षेत्रिय भेटी.

ड. वाहन व्यवस्था

इ. लेखन साहित्य.

याप्रमाणे सदरील बाबीची प्रसिध्दी देण्याचे तसेच प्रेस कॉन्फरन्समध्ये सदस्यांचे सहभाग असण्याचे सूचविण्यात आले.

ठराव– बांधकाम कामगारांचे नोंदणी अभियान राबविण्यासाठी विभागीय कार्यालयांना प्रत्येकी रू 5 लाख देण्यात येणे. व त्यासाठी विभागीय कार्यालयांना राष्टीकृत बॅके खाते उघडण्याचीं परवानगी देणे तसेच या रक्कमेचा विनियोग कामगारांचे मेळावे व जाणीव जागृती मोहिम, लहान प्रमाणातील जाहिराती उदा. पत्रके, लिफलेट इत्यादी, दुरवरच्या कामगारांना क्षेत्रिय भेटी, वाहन व्यवस्था व लेखन साहित्य इत्यादीवर करण्याचे तसेच या बाबींची प्रसिध्दी करण्याचे एकमताने ठरले.

**विषय कमांक 6 कल्याणकारी योजनांच्या नियमावलीस मान्यता देणे.**

कार्यालयाने तयार केलेल्या नियमावलीची प्रत सर्व सदस्यांना देण्यात आली. यावर नियमावलीस एकमताने मान्यता देण्यात आली. याबाबत काही सुधारणा असतील तर लेखी पत्राद्वारे कळविल्या जाव्यात. व 30 तारखेपर्यंत त्या कळविल्या न गेल्यास सदरील नियमावली 1 तारखेपासून लागू होईल, असे एकमताने ठरले.

**विषय कमांक 7– राज्य सल्लागार समितीच्या बैठकीची माहिती देणे.**

मा. अध्यक्षांनी राज्य सल्लागार समिती गठीत झाल्याचे व बैठकीतील ठरावाबाबत सर्व सदस्यांना माहिती दिली. बैठकीचा इतिवृत्तांत सर्व सदस्यांना देण्यात आला. त्याप्रमाणे बांधकाम कामगारांच्या मुलांसाठी शाळा, वसतिगृहे चालविण्यास मान्यता नसल्याचे व मंडळात उपसमिती नेमण्याची तरतूद नसल्याची स्पष्ट करण्यात आले. व तसे ठरले. सल्लागार समितीच्या जनश्री विमा योजना लागू करण्याच्या प्रस्तावास सदस्यांनी बैठकीत सूचविलेल्या मसूदयाप्रमाणे सर्वानुमते ठरावाद्वारे संमती दर्शविली. परंतु सदर योजनेत तात्काळ व इतर अनुषंगिक लाभ नसल्याने असा लाभ

दुस–या विमा कंपनीकडून प्राप्त करण्यासाठी प्रकिया करण्याचेही श्री डोंगरे यांनी सूचविले. याबाबत योग्य तो विचार व प्रक्रिया करण्याचे सर्वानुमते ठरले.

मंडळात जमा रक्कमेबाबत व गुंतवणूकीची माहिती सर्व सदस्यांना लेखी देण्यात आलेली आहे. मंडळास सुमारे रू 711 कोटी जमा झालेले असून, गुंतवणूक इत्यादी वगळता सुमारे रू 164 कोटी जमा आहेत. यास एकमताने मंजूरी देण्यात आली. रू 547 कोटी एक वर्षाच्या कायमस्वरूपी ठेवीत व उर्वरित रू 164 कोटी स्वीफ्ट खात्यामध्ये ठेवल्याच्या या तपशिलास सर्वानुमते मान्यता मिळाली.

**विषय कमांक 8– नोंदणीसाठी जाहिराती देणे.**

मंडळात कामगारांची जास्तीत जास्त नोंदणी होणे अत्यावश्यक असल्याने त्याबाबत जाहिरात दिली जावी, असे श्री ढवळे यांनी सूचविले. त्यानुसार अद्याप पावेतो दोन वर्तमान पत्रात जाहिरात दिली असल्याचे मा. अध्यक्षांनी सांगितले. अशी जाहिरात टि.व्ही. व रेडिओ वर दयावी. तसेच हॅण्डबिल, एसटी बस इत्यादीवरही मोठया प्रमाणावर दयाव्यात असे श्री. ढवळे व सारडा यांनी सुचविले. जाहिरातीपोटी 2 कोटी रूपयापर्यंतच्या खर्चास एकमताने मंजूरी देण्यात आली.

**विषय कमांक 9– मंडळास प्राप्त झालेल्या लाभार्थ्या कामगारांच्या अर्जास मंजूरी देणे.**

प्राप्त झालेल्या लाभार्थ्यांच्या अर्जाची माहिती बैठकीत देण्यात आली व त्याची यादी सादर करण्यात आली. चेक देतेवेळी त्या त्या कार्यालयाने चेक दयावेत तसेच श्री ढवळे यांनी नोंदीत कामगार हा भारतीय नागरिक असावा, हे तपासणे महत्वाचे असून, बांगला देशी किंवा नेपाळी कामगार नसेल, याबाबत जागृत राहण्याचे सुचविले.

कामगार सदस्य श्री सावंत यांनी मुद्या उपस्थित केला की, काही संघटनांनी सांगली येथे जुन्या दराने नोंदणी फीची रक्कम भरलेली आहे. परंतु कामगारांची नोंदणी झालेली नाही. यावर नोंदणी फीचा फरक भरल्यानंतर व सर्व कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतरच कामगारांची नोंदणी नियमानुसार केली जावू शकते. तसेच नोंदणी अर्ज व शुल्क इत्यादी रक्कम कार्यालयात जमा करावयाची असून, ती परस्पर मंडळाच्या मुंबई येथील खात्यावर जमा करणे चुकीचे आहे. सदरील प्रक्रिया होण्याबाबत सर्वांना एकमत दर्शविले व तसे अध्यक्षांनी स्पष्ट केले.

**विषय कमांक 10— मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळचे विषय.**

1. श्री. डोंगरे यांनी लग्नाकरीता रू 25 हजार मदत तसेच साहित्य खरेदीसाठी कर्ज रूपाने रू 1 लाख पर्यंतची रक्कम कामगारांना देणे त्याचप्रमाणे सायकल, शिलाई मशिन इत्यादी देण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. सुरूवातीस कामगारांना मलेरियाचा त्रास होवू नये म्हणून मच्छरदानी दिली जावी, असे सुचविले. याबाबत सर्व बाजूंनी अभ्यास करून योग्य तो प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्याचे सर्वानुमते ठरले.

2. अन्य राज्यातील मंडळाचा अभ्यास केला जावा व त्यासाठी मंडळ सदस्यांनी व कार्यालयीन कर्मचा—यांनी अभ्यास दौरा करावा, असे यापूर्वीच ठरले असूनही ते अद्याप निश्चित झाले नसल्याने श्री फुले यांनी निदर्शनास आणून दिले. त्यावर दिल्ली बोर्डात अभ्यास करण्यासाठी मंडळाच्या खर्चाने जाण्याचे एकमताने ठरले.

3. मंडळाने दिनांक 20 जून 2011 रोजीच्या बैठकीतील विषय कमांक 4 नुसार "बैठकीस उपस्थित असणा—या सदस्यांना रू 1000 बैठक भत्ता व बैठकीचा दिवस अधिक एक जादा दिवसाकरीता रू 1000 निवास भत्ता तसेच श्रेणी 1 च्या अधिका—यांना अनुज्ञेय असणारा प्रवास भत्ता देण्यात येईल तसेच टॅक्सी अलाउन्स रू 500 देण्यात येईल," असा ठराव पारीत केलेला आहे. सदर ठराव करताना प्रत्येक दिवसासाठी रू 1000 हा शब्द नसल्यामुळे कॅगने रू एक लाख सहा हजाराची वसूली दर्शविली आहे. याबाबत सुधारणा करण्यासाठी वरील प्रमाणे ठराव आज बैठकीत सर्वानुमते करण्यात आला. व त्याप्रमाणे कॅगला अहवाल पाठविण्याचे ठरले. श्री फुले यांनी मागील बैठकीत सुचविल्याप्रमाणे बैठकीच्या दिवशी रू 1500 भत्ता असा नवीन ठराव पुढील कालावधीसाठी अशासकीय सदस्यांच्या मागणीमुळे करण्यात आला. याबाबत चर्चेअंती हा भत्ता बैठकीच्या दिवसासाठी तसेच एक जादा दिवसाकरीता प्रत्येकी रू 1500 पुढील कालावधीसाठी करण्याचे ठरले. मा. अध्यक्षांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

कामगार आयुक्त तथा अध्यक्ष,
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई.